# मेट्रो-३ चा पहिला टप्पा पुढील वर्षी

## आरे ते बीकेसीपर्यंत धावणार पहिली भुयारी रेल्वे

**सकाळ वृत्तसेवा**

मुंबई, ता. ११ : बहुचर्चित कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ भुयारी मार्गाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. प्रकल्पाचा आरे ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) स्थानकांदरम्यानचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे; तर आरेतील कारशेडचे काम २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे 'लक्ष्य' मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने ठेवले आहे. तसेच बीकेसी ते कुलाबा मेट्रो मार्गाचा दुसरा टप्पा जून २०२४ मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.

मेट्रो-३ च्या कामाला २०१६ मध्ये सुरुवात झाली; परंतु कोरोना साथ, आरेमधील कारशेड कांजूरमार्ग येथे हलविण्यात आल्याने या प्रकल्पाला विलंब झाला. परिणामी या प्रकल्पाच्या खर्चातही वाढ झाली. राज्यात सत्तांतर होताच कांजूरमार्गऐवजी आरेमध्ये कारशेड बनविण्यास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार आरेमध्ये मेट्रो-३ च्या कारशेडचे काम सुरू झाले आहे. आतापर्यंत कारशेडचे २९ टक्के काम पूर्ण झाले असून, पहिल्या टप्प्यातील कारशेडचे काम एप्रिल २०२३ मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे.

### » भविष्यात लागणार कारशेडसाठी जमीन

1 आरेतील २५ हेक्टर जागेवर सध्या कारशेडचे काम करण्यात येत आहे; तर येथील ५ हेक्टर जागा हरित क्षेत्र म्हणून संरक्षित करण्यात येणार आहे. सध्या आरे कारशेडमध्ये ९ रेल्वे गाड्यांच्या स्टेबलिंग लाईनचे नियोजन करण्यात आले आहे. २०३० पर्यंत ३१ गाड्या आणि २०५० पर्यंत ५५ गाड्या मेट्रो-३ साठी उपलब्ध होणार आहेत.

2 कारशेडमध्ये २४० डबे राहू शकतात; पण २०३१ नंतर ५५ डबे अर्थात ५५ गाड्या कारशेडमध्ये ठेवण्यासाठी सध्याचे कारशेड अपुरे पडणार आहे. सध्या मेट्रो-३ साठी अतिरिक्त जागेची आवश्यकता नाही; मात्र २०४० नंतर एक किंवा दोन हेक्टर जागेची आवश्यकता भासणार असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने स्पष्ट केले आहे.



### महिना अखेरीपासून मेट्रो रेल्वेच्या चाचण्या

दरम्यान मुंबईत दाखल झालेल्या मेट्रो रेल्वेच्या चाचण्याही महिना अखेरीपासून सुरू करण्यात येणार आहेत. दुसऱ्या टप्प्यातील कारशेडचे काम जुलै २०२३ मध्ये पूर्ण होईल. कारशेड पूर्ण करतानाच मेट्रो-३ मार्गिकेचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यात येणार आहे. या पहिल्या टप्प्यासाठी सुरक्षा प्रमाणपत्र घेण्याच्या कामास जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये सुरुवात करण्यात येणार आहे. मुंबईकरांच्या सेवेत आणखी एक मेट्रो रेल्वे दाखल होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.